**MHSN090011442025**

दाखल तारीख : २२.०९.२०२५
नोंदणी तारीख : २२.०९.२०२५
निकाल तारीख : ११.०३.२०२६
कालावधी वर्षे महिना दिवस
००  ०५  १९

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तासगांव यांचे न्यायालयात**

(पिठासन अधिकारी श्रीमती बी.आर.आवचारी दुर्गवडे)

**नियमित फौजदारी खटला क्र.२२२/२०२५**

**निशाणी क्र.**

**महाराष्ट्र शासनतर्फे,** }
पोलीस निरीक्षक, तासगांव पोलिस ठाणे, } **-- अभियोगपक्ष**
तासगांव, जि.सांगली. }

**-- विरुध्द --**

१. **अशोक विलास सुर्यवंशी** }
वय – ४२ वर्षे, व्यवसाय-शेती, }
२. **सविता अशोक सुर्यवंशी** }
वय – ४२ वर्षे, व्यवसाय-शेती, }
३. **राहुल अशोक सुर्यवंशी** } **-- आरोपी**
वय – २४ वर्षे, व्यवसाय-शेती, }
४. **रोहन अशोक सुर्यवंशी** }
वय – २२ वर्षे, व्यवसाय-शेती, }
सर्व राहणार डोंगरसोनी,
तालुका तासगांव, जि. सांगली.

**भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११५(२), ११८(१), ३५२ सह कलम ३(५) प्रमाणे.**

---

अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ : श्रीमती एस. व्ही. पाटील.

आरोपींतर्फे विधिज्ञ : श्री. के. व्ही. पाटील.

---

## न्या य नि र्ण य

(जाहीर दिनांक ११ मार्च २०२६)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११५(२), ११८(१), ३५२ सह ३(५) प्रमाणे चालविणेत आला.

**अभियोगपक्षातर्फे थोडक्यात हकीकत अशी आहे की –**

२. दिनांक १७.०३.२०२५ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१) व त्याचा मुलगा अभिजित (अ.सा.क्र.२) हे नविन घराच्या बांधकामाच्या ठिकाणी थांबले होते त्यावेळी फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१) ला त्याच्या आई–वडिलांच्या घराजवळून भांडणाचा आवाज ऐकू आला. त्यानंतर फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१) व त्याचा मुलगा अभिजित (अ.सा.क्र.२) हे त्यांचे आई–वडिलांच्या घराजवळ गेले असता आरोपी फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१) चे वडील निवृत्ती (अ.सा.क्र.३) यांना शिवीगाळ करुन धक्काबुक्की करत होते. फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१) व अभिजित (अ.सा.क्र.२) हे भांडणे सोडवित असतांना आरोपींनी त्यांनादेखील शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली. त्यावेळी फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१) ने त्याचे वडील निवृत्ती (अ.सा.क्र.३) यांना काय झाले असे विचारले असता त्यांनी असे सांगितले की आपले घराजवळ लावलेली झाडे आरोपी क्र. १ चे शेळ्यांनी खाल्ली म्हणून मी त्यांना विचारत असतांना आरोपींनी त्यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यावेळी फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१) हा आरोपींना समजुन सांगत असतांना आरोपी क्र. ३ ने कोयत्याने मारले व आरोपी क्र. १ ने काठीने डोक्यात मारले. त्यावेळी फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१) ची पत्नी सुनिता (अ.सा.क्र.४), मुलगी संध्याराणी व पुतणी ऋतुजा तसेच मुलगा अभिजित (अ.सा.क्र.२) यांनी भांडणे सोडविली. सदरील भांडणे

सोडवितांना मुलगा अभिजित (अ.सा.क्र.२), वडील निवृत्ती (अ.सा.क्र.३) व पत्नी सुनिता (अ.सा.क्र.४) जखमी झालेले आहेत. दि. १८.०३.२०२५ फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१) ने ग्रामीण रुग्णालय तासगांव येथे वैद्यकिय अधिकारी यांच्यासमोर दिलेल्या जबाबावरुन आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११५(२), ११८(१), ३५२ सह ३(५) प्रमाणे फिर्याद दाखल झाली.

३. फिर्याद प्राप्त झाल्यानंतर गुन्हा नोंदणी क्र.१४०/२०२५ नोंदविला. सदर गुन्ह्याचा तपास श्री उत्तम भगवान ओंबासे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, तासगांव पोलीस ठाणे यांना वर्ग केला. तपासी अधिकारी यांनी तपास करुन घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळाचा नकाशा काढला. तसेच गुन्ह्यातील हत्यार लोखंडी कोयता व एक कळकाची काठी जप्त करुन जप्ती पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१), अभिजित (अ.सा.क्र.२), निवृत्ती (अ.सा.क्र.३) व सुनिता (अ.सा.क्र.४) यांची वैद्यकिय प्रमाणपत्रे दाखल केली. तपासाअंती आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा मिळून आल्याने आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११५(२), ११८(१) व ३५२ सह ३(५) अन्वये मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींना भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११५(२), ११८(२) व ३५२ सह ३(५) प्रमाणे दोषारोप वाचून समजावून सांगितला. आरोपींनी सदरील दोषारोप नाकारुन गुन्हा कबूल नाही असे सांगितले आणि संपरिक्षेची मागणी केली.

५. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचे गुन्हे शाबीत करणेसाठी फिर्यादी साक्षीदार क्र.१ गुलाब निवृत्ती सुर्यवंशी यांची साक्ष (नि.२१), साक्षीदार क्र.२ अभिजित गुलाब सुर्यवंशी यांची साक्ष (नि.२२), साक्षीदार क्र. ३ निवृत्ती भिमराव सुर्यवंशी यांची साक्ष (नि.२३) व साक्षीदार सुनिता गुलाब सुर्यवंशी यांची साक्ष (नि.२४) प्रमाणे नोंदविली.

६. अभियोगपक्षाच्या पुराव्यात आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा मिळुन न

आल्याने आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१(१) (ब) अन्वये निवेदन नोंदविले नाही. आरोपींनी त्यांच्या बचावात कोणताही पुरावा दाखल केला नाही.

७. प्रस्तुत प्रकरणातील तथ्ये व अभिलेखावरील पुरावा यानुसार माझ्या निष्कर्षास खालील वादप्रश्न उपस्थित झाले. सदरील वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे –

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष शाबीत करतो का, दि.१७.०३.२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजण्याच्या सुमारास डोंगरसोनी, ता.तासगांव, जि.सांगली येथे निवृत्ती (अ.सा.क्र.३) चे घरासमोर, आरोपींनी त्यांचे समान उद्देश साध्य करणेकरिता, फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१) व अभिजित (अ.सा.क्र.२), निवृत्ती (अ.सा.क्र.३) व सुनिता (अ.सा.क्र.४) यांना लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली? | **नकारार्थी** |
| २. | अभियोगपक्ष शाबीत करतो का, वरील तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपींनी त्यांचे समान उद्देश साध्य करणेकरिता, आरोपी क्र. १ ने काठीने व आरोपी क्र.३ ने कोयत्याने फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१) ला मारहाण करुन इच्छापूर्वक गंभीर दुखापत पोहचविली ? | **नकारार्थी** |
| ३. | अभियोगपक्ष शाबीत करतो का, वरील तारीख, वेळी व ठिकाणी, आरोंपीनी त्यांचे समान उद्देश | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | साध्य करणेकरिता, फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१), अभिजित (अ.सा.क्र.२), निवृत्ती (अ.सा.क्र.३) व सुनिता (अ.सा.क्र.४) यांचा उद्देशपूर्वक अपमान करुन ज्यायोगे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग किंवा अन्य कोणताही अपराध घडेल असे कृत्य केले? | |
| ४. | आदेश कोणता ? | **आरोपींना निर्दोषमुक्त केले.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

८. अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ श्रीमती एस. व्ही. पाटील यांनी असा युक्तीवाद केला की, अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर दाखल केला आहे. सदरील पुराव्यांवरुन आरोपींनी गुन्हा केलेचे शाबीत होते त्यामुळे आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा देणेत यावी.

९. आरोपींतर्फे विधिज्ञ श्री.के. व्ही. पाटील यांनी असा युक्तीवाद केला की, आरोपींनी कोणताही गुन्हा केलेला नाही. फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१), अभिजित (अ.सा.क्र.२), निवृत्ती (अ.सा.क्र.३) व सुनिता (अ.सा.क्र.४) व आरोपींमध्ये मे.न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली आहे त्यामुळे फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१), अभिजित (अ.सा.क्र.२), निवृत्ती (अ.सा.क्र.३) व सुनिता (अ.सा.क्र.४) यांनी अभियोगपक्षास सहाय्य केलेले नाही. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आणलेला नाही त्यामुळे आरोपीं निर्दोषमुक्त होणेस पात्र आहेत.

### <u>वादप्रश्न क्र.१ ते ३</u> –

१०. वादप्रश्न क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांच्या निष्कर्षाचे कारणमिमांसेचा विचार एकाचवेळी करणेत आला.

फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१), अभिजित (अ.सा.क्र.२), निवृत्ती (अ.सा.क्र.३) व सुनिता (अ.सा.क्र.४) यांनी अभियोगपक्षास सहाय्य केले नाही. अभियोगपक्षाने सदरील साक्षीदारांना उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परंतू, अभियोगपक्षास सदरील साक्षीदारांच्या पुराव्यातून आरोपींविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा मिळून आला नाही. त्यामुळे याकामी फिर्याद शाबीत झाली नाही. फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१), अभिजित (अ.सा.क्र.२), निवृत्ती (अ.सा.क्र.३) व सुनिता (अ.सा.क्र.४) व आरोपीं त्यांचेत मे.न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेबाबत पुरशीस (नि.३१) अभिलेखावर दाखल केली आहे. आरोपींनी घटनास्थळ पंचनामा (नि.२५), जप्ती पंचनामा (नि.२६) व फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१), अभिजित (अ.सा.क्र.२), निवृत्ती (अ.सा.क्र.३) व सुनिता (अ.सा.क्र.४) यांची वैद्यकिय प्रमाणपत्रे (नि.२७ ते ३०) मान्य केली आहेत. फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१) ने त्याला पूढील साक्षीदार तपासावयाचे नाहीत अशी पुरावा बंद पुरसीस (नि.३२) दाखल केली आहे.

११. अभियोगपक्षातर्फे दाखल केलेल्या पुराव्यांवरुन असे दिसून येते की, फिर्यादी गुलाब (अ.सा.क्र.१), अभिजित (अ.सा.क्र.२), निवृत्ती (अ.सा.क्र.३) व सुनिता (अ.सा.क्र.४) व आरोपींमध्ये मे.न्यायालयाबाहेर आपसांत झालेल्या तडजोडीमुळे साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य केले नाही त्यामुळे अभियोगपक्ष आरोपींविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर दाखल करु शकला नाही. अभियोगपक्षाने तपासलेले साक्षीदार व दाखल केलेले पुरावे हे अपुरे व संदिग्ध असल्याने तथाकथित घटना घडली किंवा कसे याबाबत संशय निर्माण करतात. अभियोगपक्ष आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यास असमर्थ ठरल्याने मी वादप्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविते.

**<u>वादप्रश्न क्र.४</u> –**

१२. वरनमूद चर्चा, निरीक्षण आणि निष्कर्ष पाहता अभियोगपक्ष आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यास असमर्थ ठरला त्यामुळे आरोपीं

निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहेत. त्यामुळे मी वादप्रश्न क्र.४ चे निष्कर्षादाखल खालील आदेश पारीत करते –

**आ दे श**

(१) आरोपी क्रमांक १ अशोक विलास सुर्यवंशी, क्र.२ सविता अशोक सुर्यवंशी, क्र.३ राहुल अशोक सुर्यवंशी व क्र. ४ रोहन अशोक सुर्यवंशी यांना भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११५(२), ११८(१), व ३५२ सह ३(५) प्रमाणे गुन्हा केल्याच्या आरोपातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) प्रमाणे निर्दोषमुक्त केले.

(२) आरोपींचे वैयक्तीक जातमुचलके (बंधपत्रे) व जामीनकदबे रद्द केले.

(३) आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रु.२५,०००/– चा जामीनकदबा व वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

(४) जप्त मुद्देमाल एक कळकाची काठी मुल्यहिन असल्याने अपिल कालावधीनंतर नाश करण्यात यावी.

(५) जप्त मुद्देमाल एक लोखंडी कोयता अपिल कालावधीनंतर जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे योग्य त्या विल्हेवाटीसाठी पाठविण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला)

BHANUPRIYA RAHUL AVACHARI DURGAWADE
Digitally signed by BHANUPRIYA RAHUL AVACHARI DURGAWADE
Date: 2026.03.13 13:42:56 +0530

ठिकाण – तासगांव
दिनांक – ११.०३.२०२६

**(श्रीमती बी.आर.आवचारी दुर्गवडे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तासगांव